कर्मयोगी बाबा आमटे मानवता पुरस्कारप्राप्त..

# स्वप्नवेडी माणसं




संकलन व शब्दांकन

**मधुकर अंबरकर (यादवसूत)**



'ज्वाला आणि फुले'मधील श्रद्धेय बाबा आमटे यांचे चिंतन ज्यांच्या समाजकार्याशी एकरूप होते, अशाच व्यक्तींना दरवर्षी 'बाबा आमटे मानवता पुरस्कार' देण्यात येतो. या चिंतनाची दाहकता ज्यांच्या जीवनात पेटली त्यांच्या कार्याची यथार्थता समाजासमोर प्रतिबिंबीत व्हावी, यासाठी हा लेखनप्रपंच...! जीवन उच्चतम् होण्याकरीता तो वाचकांना भावेल व बाबांच्या विचारांचा मुलायम स्पर्श या पुस्तकातून जाणवेल, असा मला विश्वास वाटतो.

**मधुकर अंबरकर**
(यादवसुत)



"स्वयंप्रेरणा हेच ज्यांचे बळ आहे अशा, माणुसकीचा वसा घेतलेल्या व्रतस्थांची ओळख करून देणारे; आपल्याला मन आहे याची जाणीव असणाऱ्या प्रत्येकाने वाचायला हवे, असे सुंदर पुस्तक...

कुठल्याही व्यवस्थेविरुद्ध न जाता समांतर मार्गाने बदल घडवून आणणाऱ्या माणसांचे हे मार्ग आपल्यालाही आपल्या जीवनप्रवासात नक्कीच विचार करायला लावतात.

श्वास घेणे आणि जगणे यातील अंतर स्पष्ट करत मनाला नवप्रेरणेने भारून टाकणारे **स्वप्नवेडी माणसं** संग्रही असायलाच हवे!"

आपण
पब्लिकेशन

# ज्ञान गाळते घाम...



## डॉ. आशीष सातव

## डॉ. कविता सातव

स्वप्नवेडी माणसं

# ज्ञान गाळते घाम...

- Arise, awake and stop not till the goal is achieved.
- To serve the God, serve man.
- नवनिर्मितीच्या नादाने झपाटलेले तरुण माथेफिरू हवे आहेत.
- पावित्र्य, धीर, चिकाटी या तीन गोष्टी कार्यसिद्धीसाठी आवश्यक असतात.
- साहसाचा मला हव्यास आहे आणि अशा साहसांना सीमा नसतात.
- थोर श्रद्धांना महान अग्निदिव्यातून जावे लागते.
- जो खूप सहन करील, त्याला पुष्कळ काही करून दाखविता येईल.
- Heart takes precedence over head.
- 'ज्ञान गाळते घाम' ही जीवनाची उत्कृष्ट कार्यशैली आहे.
- जीवनाच्या मांगल्याची जाणीव हाच जगातला सर्वश्रेष्ठ धर्म आहे.
- जीवन उमलावं, फुलावं, आनंदावं आणि समर्पित व्हावं.

**ख**रं म्हणजे लोक भरपूर आणि वैविध्यपूर्ण ग्रंथवाचन करत असतात. जे साहित्य मनाला जाऊन भिडतं त्यांचा परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर कळत न कळत होत असतो. काही वाचक केवळ वाचतात, तर काही संवेदनशील वाचक शब्दांचा, विचारांचा आशय समजून रक्तामध्ये भिजवून टाकतात. मग ते विचारच त्या माणसाची जीवनशैली बनते.

महात्मा गांधी, विनोबा, सानेगुरुजी, विवेकानंद, बाबा आमटे इत्यादी विचारवंतांचे साहित्य आजवर अनेकांनी वाचले असेल, पण त्या

सर्वांच्याच रक्तात ते भिनले, असे म्हणता येणार नाही. मात्र 'महान'चे निर्माते डॉ. आशीष सातव याला अपवाद आहेत. सर्वोदयी कार्यकर्ते, महान कर्मयोगी ठाकुरदास बंग यांचे निष्ठावान सहयोगी श्री. वसंतराव बोंबटकर हे डॉ.आशीष सातव यांचे मातामह (आजोबा), गांधीजींच्या प्रत्यक्ष सहवासात राहिलेले. विनोबांच्या भूदान चळवळीत कार्य केलेले. अशा आजोबांचा प्रभाव बालवयापासूनच आशीष यांच्यावर पडला होता. 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या विचारांचा खोलवर परिणाम त्यांच्या मनावर विद्यार्थी दशेतच झाला होता. नववीत असतांनाच त्यांनी बाबा आमटे यांच्या 'श्रमसंस्कार छावणी'मध्ये सहभाग घेतला होता. विवेकानंदांचे साहित्य वाचले होते. म.गांधी, विवेकानंद हे त्यांचे दीपस्तंभ होते. 'उठा जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका!' (Arise, awake and stop not till the goal is achieved), ही विवेकानंदांची शिकवण त्यांच्या मनाला अस्वस्थ करत होती. असे संस्कार व अशी अस्वस्थताच सातवांच्या भावी कार्याची दिशा निश्चित करीत होती.

विद्यार्थी दशेपासूनच ते कुशाग्रबुध्दीचे होते. त्यांचे १२ वी पर्यंतचे शिक्षण वर्धेलाच झाले. त्यावेळी १२ वी नंतर वैद्यकीय शिक्षण घेवून डॉक्टर व्हायचे आणि भारतातल्या ग्रामीण भागातच स्वास्थसेवा करायची, असा त्यांनी पक्का निर्धार केला. नागपूरच्या शासकीय महाविद्यालयात त्यांना एमबीबीएससाठी प्रवेश मिळाला(१९८८). शिकत असतांनाच डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाताई आमटे, डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, डॉ. रवी कोल्हे, डॉ. सुदर्शन यांच्या दुर्गम व दूरस्थ आदिवासी क्षेत्रात सुरू असलेल्या सेवा कार्यास त्यांनी भेटी दिल्यात. डॉ. प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग हे सातवांचे मुख्य प्रेरणास्त्रोत आहेत. ह्या भेटीमुळेच ग्रामीण भागापेक्षाही आदिवासी क्षेत्रात वैद्यकीय सेवेची मोठ्या प्रमाणात गरज असल्याचे आशीष सातवांच्या लक्षात आले. म्हणूनच एमबीबीएस नंतर एम.डी. करत असतांनाच मेळघाटच्या आदिवासी लोकांसाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी केला. मेळघाटातच कार्य करण्याचे ठरविल्यामुळे तशा प्रकारची जीवनशैली आत्मसात करणे हे सुध्दा तितकेच आवश्यक होते. त्यामुळे मग त्यांनी तसा सराव सुरु केला. अत्यंत साधी राहणी, सुमारे ४५ ते ४६ अंश से. तापमानाची सवय, उन्हाळ्यातही कुलर-पंखा न वापरणे, थंड पाण्याने आंघोळ करणे अशा प्रकारे त्यांनी सराव करुन घेतला. नियमित योगासने, ध्यान, 'गीताई' पठण यातील खास करुन स्थितप्रज्ञाची लक्षणे वाचणे, महात्मा गांधींचे

सत्याचे प्रयोग, विवेकांनंदांचे विचार यामुळे त्यांच्या स्वभावात व आचरणात फार मोठे परिवर्तन घडून आले. आत्मसंयमन, क्रोधनियंत्रण, अहंभावना, द्वेषभावना इ. सारख्या विकारावर नियमित ध्यानसाधनेने नियंत्रण मिळविता येते, याची अनुभूती त्यांनी घेतली. यातूनच त्यांना मानसिक शांती, शारीरिक व मानसिक बळ या गोष्टींची उपलब्धी झाली व तीच भावी जीवनात समाजकार्य करतांना उपयोगी पडली.

आदर्शवादी विचारांच्या, समाजसेवी कृतीच्या व्यक्तींच्या नियमित भेटी व चर्चा यातूनच त्यांच्या भावी जीवनासाठी सद्‌गुणाची, जीवनमुल्यांची शिदोरी गोळा होत गेली.

'अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह,
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन,
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना'

ही एकादश व्रते सातवांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनलीत. 'Seven habits of highly effective people' ह्या पुस्तकाच्या वाचनाने त्यांना समाजकार्यासाठी प्रेरणा मिळाली. त्यामुळेच 'एमबीबीएस'ला असतांना जेव्हा मोवाडला महापूर आला, तेव्हा पुरग्रस्तांच्यासाठी मदतकार्य शिबीरात प्रत्यक्षपणे सहभाग घेवून ज्यांचे सर्वस्व महापुराने लुटून नेले त्यांना कपडे वाटप करण्याचे काम केले. हीच आशीष सातव यांच्या सेवा कार्याची नांदी ठरली.

डॉ. आशीष यांचे शेतीनिष्ठ वडील श्री. रामभाऊ सातव, दाताळ्याचे (जि. बुलढाणा) वसंतराव बोंबटकराची कन्या म्हणजेच डॉ. आशीष यांची आई सौ. कमलाबाई या मातापित्याचे सुसंस्कार, सासरे श्री. रेंगे, पत्नी सौ. डॉ.कविता (नेत्रतज्ज्ञ), बंधू अविनाश व अजय यांचे डॉ. सातवांच्या प्रत्येकच कार्यासाठी मोलाचे योगदान लाभले आहे. विशेष म्हणजे त्यांचा मुलगा चि.अथांग याचा समजुतदारपणा आपल्या समाजसेवेला मोठा आधार आहे, असे त्यांना वाटते.

एमबीबीएस, एम.डी. झाल्यानंतर सुरुवातीला डॉ. आशीष यांनी सेवाग्राम येथे Department of Medicine मध्ये व्याख्याता म्हणून नोकरी केली. तीसुध्दा पुढच्या कामासाठीची थोडीफार आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीनेच. परंतु 'झोपडीतल्या पणत्या उजळायच्या, करुणेचे मळे फुलवून आनंदाची उद्याने निर्माण करायची' तसेच 'मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा (To serve God, serve man)', ही विवेकानंदांची शिकवण कृतीत

उतरवायची; परमेश्वराने डॉक्टर बनवून खऱ्या देवाची सेवा करण्याची आपल्याला संधी दिली त्या संधीचे सोने करायचे, असे डॉ. सातवांनी ठरवूनच टाकले. 'अश्रुंची फुले' करण्याची जादू डॉक्टर करीत असतात.

१९९८ साली डॉ.आशीष यांनी सेवाग्रामच्या नोकरीला रामराम ठोकला आणि 'महान'ची स्थापना केली आणि मेळघाटात दवाखाना सुरू केला. MAHAN ही **M**editation, **A**ddietion, **H**ealth, **A**ids, **N**utrition आद्याक्षरे घेवून निर्माण झालेली सेवासंस्था आहे. या नावातच संस्थेची उद्दिष्टे आणि कार्यपध्दती समाविष्ट झाली आहेत. खरं म्हणजे १९९७ च्या नोव्हेंबरपासूनच सातवांनी मेळघाट प्रकल्पास सुरुवात केली होती.

'मेळघाट' हा आदिवासींचा भाग. सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या मेळघाटाची एकूण लोकसंख्या २ लक्ष ८० हजार असून येथे कोरकू जमातीचे आदिवासी लोक राहतात. शेती करणे, रानमेवा गोळा करणे, काबाडकष्टाची कामे करणे, अनवाणी पायांनी अख्खे रान तुडवणे, जंगली श्वापदांच्या छायेतच वावरणे हे या आदिवासींचे जीवनवास्तव. सातपुड्याच्या डोंगरावर थोडीशी सखल समतल जागा आढळली की, तेथे झोपड्या बांधून वस्ती करून ते राहतात. अशा वस्तींना वाडी किंवा पाडा असे म्हणतात. साधारणत: पाड्यात राहणारी सगळे एकमेकांचे नातेवाईकच असतात. पळस, सागवान, शिसम अशा झाडांची जंगले सगळीकडे पाहावयास मिळतात. मोहाळी, घाटान, घटांग, मांगाका, हरिसाल, सेमाडोह, चित्री, दुन्रा, मालुर, दिदम्दा, माणसुधावडी, उतावली अशी गावांची विचित्र नांव ऐकली की नवल वाटतं. 'सिपना' ही मेळघाटातली मोठी आणि प्रमुख नदी सातपुड्यात सगळीकडून वाहतांना दिसते. उन्हाळ्यातसुद्धा अनेक ठिकाणी नदीस जीवंत झरे असल्याने 'उपसा सिंचन' पध्दतीने पाणी पुरवठा करुन गहू, चना अशी पिके घेतली जातात. सेमाडोहचा व्याघ्रप्रकल्प, हरिसालचे वनविश्रामगृह पाहण्यासारखे आहे. गवे, रानडुक्करे, हरणे, वाघ, बिबटे, चितळ अशा प्राण्यांचे वास्तव्य या संरक्षित क्षेत्रात आहे. सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वनोपज तपासणी नाके जागोजागी पाहायला मिळतात. इकडे मुख्यत्वे हिंदी भाषा बोलली जाते. पण शालेय शिक्षण मात्र मराठीतून देत असल्याने मुलांना 'क' म्हणता 'ढ' समजत नाही. शिक्षणाची अशी दुर्दशा, अंधश्रध्दा, निरक्षरता, व्यसनाधिनता यामुळे लोकांचे जीवनमान अतिशय खालावलेले दिसून येते. रोगांवर वैद्यकीय उपचार करतात, हे इथल्या खेडुतांना बरेच दिवसपर्यंत माहितसुध्दा नव्हते. मांत्रिक व भुमका

यांचे प्राबल्य मेळघाटात मोठ्या प्रमाणात आहे. अंगावर लोखंडी सळईने चटके देणे, कापूर जाळणे, सेंदुरचर्चीत लाकडी पुतळे करुन पूजणे असा सगळा प्रकार मेळघाटात अजूनही सुरुच आहे. त्याचा परिणाम अर्थातच लोकांच्या आरोग्यावरच झाला आहे. स्वातंत्र्याची साठी उलटूनही मेळघाटातील आरोग्यसेवेची अवस्था अतिशय वाईट आहे. गुटखा, दारु व व्यसनाने तरुणांतही वार्धक्याची छाया दिसून येते. कुपोषण व १६ ते ६० वर्षे गटातील मृत्युचे मोठे प्रमाण, गर्भवती स्त्रियांचे मृत्यूचे प्रमाण जास्त दिसून येते. अशा सगळ्या विपरित पार्श्वभूमीवर काम करतांना डॉ. आशीष सातव यांना केवढे परिश्रम पडले असतील याची कल्पनासुध्दा करवत नाही. परंतु 'नवनिर्माणासाठी नवनिर्मितीच्या नादाने झपाटलेले तरुण माथेफिरू हवे आहेत', याची डॉ आशीष सातवांना पूर्ण जाणीव होती. किंबहुना तो त्यांचा पिंडच होता.

सातपुड्याच्या कुशीतला मेळघाट मध्यप्रदेशाशी नातं ठेवून आहे. अर्थातच इथल्या लोकांचे राहणीमान, जीवनपध्दती, घरांची रचना, सण, उत्सव, चालीरिती मध्यप्रदेशासारख्याच दिसून येतात. तीव्र उताराची गवती छपरे, बांबुच्या व कुडाच्या सारवलेल्या भिंती, त्यावर पांढऱ्या मातीची रेखीव पट्टी, झिंगोर्डीच्या तट्टाच्या पानोळ्या अशा स्वरुपांची आदिवासींची घरे वाड्यापाड्यातून पाहावयास मिळतात. क्रेट कोब्रा, व्हायपर जातीच्या सापांचं तर मेळघाटात साम्राज्य आहे.

पदव्युत्तर शिक्षण घेतांना थोडी बचत करून व सेवाग्राम येथे नोकरी करतांना अत्यंत साधेपणाने जीवनयापन करुन डॉ. सातव यांनी १ लक्ष रुपयांची बचत केली होती. त्याकाळात त्यांना अनेक जीवघेण्या संकटाशी सामना करावा लागला. प्रथम कोलुपूर या छोट्याशा वस्तीत डॉक्टरांनी बाह्यरुग्ण विभाग सुरू केला. त्यानंतर धारणी येथे ४ खोल्यांची इमारत भाड्याने घेतली. बाह्यरुग्ण तपासणे, आंतररुग्ण तपासणे हे सगळे या छोट्याशा जागेतच सुरू होते. कधी कधी रुग्णांनी उलटया केल्या म्हणजे खूपच त्रासही व्हायचा. लागून डॉक्टरांची जेवणाची खोली व बेडरुम होती. सेवाग्रामला असतांना प्रशस्त भव्य, सर्व सोईंनी सुसज्ज दवाखान्यात काम करण्याची सवय होती. पण मेळघाटाच्या या छोटेखाणी दवाखान्यात तर हार्ट अटॅक, ब्रेन हॅमरेज झालेल्या रुग्णावर उपचार करावे लागत होते. कधी कधी तर वीजपुरवठा खंडीत असतांनाही त्यांना अंधूक प्रकाशात काम करावे लागत असे. जणू काही येथे प्रतिकुलतेचे साम्राज्यच होते. परंतु 'श्रध्दा आणि

सबुरी'चा मंत्र त्यांना पाठ होता. 'साहसाचा मला हव्यास आहे आणि अशा साहसांना सीमा नसतात, त्यांना फक्त मातीच्या वास्तव स्पर्शाची अट असते', हे बाबा आमटे यांचे सूत्र सातवांना लागू पडणारे आहे.

एके रात्रीचा प्रसंग आहे. मध्यरात्री १२ वाजेचा सुमार होता. हृदयविकाराचा (Acute myocardial in fraction with pulmonary edma) तीव्र झटका आलेला रोगी धारणीच्या शासकीय रुग्णालयात भरती झाला होता. त्याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने डॉ आशीष सातव यांना बोलावणे गेले. जातांना डॉक्टरांनी ECG Machine व इंजेक्शन एवढेच सोबत नेले होते. दवाखान्यात Cardiac monitor किंवा अन्य उपकरणे उपलब्ध नव्हती. आणि प्रसंग पडलाच, तर मोठा दवाखानासुध्दा धारणीपासून जवळ नव्हता. अशा अभावात्मक स्थितीत उपचार करणे म्हणजे सातवांच्या वैद्यकीय ज्ञानाची व अनुभवाची पूर्ण कसोटी होती. पण 'साहसाचा हव्यास' मात्र होता. यापूर्वी नागपूरला सेवाग्रामला असतांना परिपूर्ण उपकरणे, सदंर्भ ग्रंथालय, तज्ज्ञ डॉक्टरांचा चमू, प्रशिक्षित परिचारिका सर्व काही असायचे. त्यामुळे या परिस्थितीचा सातव प्रथमच अनुभव घेत होते. जर आपण उपचार केले आणि उपचारादरम्यान रोगी दगावला, तर प्रचंड लोकक्षोभाचा सामना करावा लागणर होता आणि जर यश आले, तर त्यांची प्रतिमा उजळणार होती. काय करावे, काही सुचत नव्हते. अखेर कार्यनिष्ठेने संभ्रमावस्थेवर विजय मिळविला. 'काहीही होवो, रुग्णावर उपचार करायचेच', या निर्धाराने त्यांनी काम सुरू केले. त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीनेच हे घडून आले. ईश्वरकृपेने पहाटे ४ वाजेच्या सुमारास तो रुग्ण धोक्याबाहेर आला. डॉक्टरांचा जीव भांड्यात पडला. त्यांचा उत्साह, आत्मविश्वास वाढला. म्हणूनच आजवर त्यांनी ९०० पेक्षा जास्त अत्यवस्थ रुग्णांना जीवदान दिले आहे. पावित्र्य, धीर व चिकाटी यामुळेच डॉ. आशीष सातव यांना हे यश मिळाले.

मेळघाटातले ते दिवस अतिशयच खडतर होते. २००४ सालची घटना आहे. दिवस पावसाळ्याचे होते. नवीन घरामध्ये सामान हलविण्याच्या कामात सर्वजण गुंतले होते. एवढ्यात डॉ. आशीष यांना जोरदार शॉक लागला. पाठोपाठ आई कमलाताई त्यांना सोडवायला आल्या, तर त्याही चिपकल्या. काही सेकंदात दोघेही बेशुध्द झाले होते. विठ्ठलपांडे नावाच्या माणसाला हे लक्षात आले. त्याने प्रसंगावधान राखून लाकडी काठीने विद्युत प्रवाह खंडीत केला आणि मायलेकांचे प्राण वाचविले. कदाचित सातवांच्या

पूर्वपुण्याईनेच तो माणूस देवदूत बनून आला होता. या घटनेने डॉ. आशीष मात्र खचले नाहीत. उलट पुन्हा पूर्ण उत्साहाने, जिद्दीने, ताकदीने समाजसेवेच्या कामाला लागले.

अडथळ्यांनीच संधी निर्माण केल्याची अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनात पाहावयास मिळतात. मेळघाटात कार्य करतांना अशा कितीतरी कसोट्यांचा त्यांना सामना करावा लागला. पण खरंतर नदीचं सौंदर्य वाढतं ते खळखळण्याने. ती जेव्हा दऱ्या-खोऱ्यांतून, माळ-घाटांतून, दगड-धोंड्यांतून, खडकाळ रानातून, झाडीझुडूपांतून वाहत असते, तेव्हाच तिच्या सौंदर्याचे खरेखुरे दर्शन होत असते. एरवी मैदानी भागातून वाहणारी नदी कुणाच्या नजरेत फारशी येत नाही. डॉ. सातवांचे जीवन या सरितेसारखेच सुंदर झाले आहे. संकटानीच त्यांच्या जगण्याचे सौंदर्य वाढविले आहे. 'जो संकटों का वीरता से सामना करे, वो ही मनुष्य है', हे चतुरसेन शास्त्री यांचे विचार खरेच आहेत. सातवांचे हे झपाटलेपण एकमेवाद्वितीय असे आहे. कारण १९९८ पासून आजपावेतो कोण्याही नवीन एमबीबीएस झालेल्या डॉक्टरने धारणीच्या या भागात दवाखाना टाकण्याचे धाडस केलेले नाही. त्यामुळेच की काय डॉक्टर सातव हे एमबीबीएस, एम.डी.(मेडीसीन) शिकलेले असतील यावर अनेकांचा विश्वासच बसत नव्हता. हा इतका शिकलेला डॉक्टर या दुर्गम भागात कशाला बरे येईल? हीच धारणीकरांची धारणा झाली होती.

ब्रेन हॅमरेज झालेल्या ५० वर्षीय गृहस्थाला बेशुध्दावस्थेत घेऊन काही लोक सातवांच्या छोट्याशा दवाखान्यात आले. अमरावती व इंदोरच्या डॉक्टरांनी तर 'जगणारच नाही' असे सांगितले होते. त्यामुळे मोठ्या दवाखान्यातून नाकारलेल्या अशा रोग्याला सातवांनी भरती करून घेणे ही गोष्ट तशी अव्यवहार्य होती. पण 'मी औषध देईन, 'तो' बरा करेल' यावरचा त्यांचा विश्वास त्यांना उत्साहीत करून गेला. त्या विश्वासाने त्यांनी रुग्णांवर सतत सात दिवस अहोरात्र, डोळ्यांत तेल घालून उपचार केले. जेमतेम ९ वा वर्ग शिकलेला एक मुलगा त्यांच्या मदतीला होता. दररोज ३० ते ४० लोक त्या रुग्णास भेटायला यायचे. त्या जमावाचे मनावर खूपच दडपण होते. कारण हे लोक रोगी दगावला, तर डॉक्टरांची बदनामी करतात. त्यामुळे चांगल्या डॉक्टरांची प्रतिमा डागाळते. परंतु ईश्वर कृपेने आठव्या दिवशी यश आले. रोगी वाचला आणि पाहता पाहता डॉक्टरांना लोकमान्यता व प्रसिध्दी मिळाली.

एकदा तर जेमतेम ५ वर्षांची मुलगी दवाखान्यात आली. तिला सेलेब्रल मलेरिया झाला होता. स्थिती गंभीर होती. डॉक्टर आशीष बालरोगतज्ज्ञ नव्हते. त्यामुळे बराचवेळपर्यंत त्या मुलीवर उपचार करावे की, नाही याबद्दल ते विचार करू लागले. परंतु बाबा आमटे यांच्या विचाराने त्यांना बळ दिले. 'झुंजत रहा, ढासळू नका, कारण तुम्ही तुमच्या सोबत पूर्णत्व नेत आहात'. ठरले, 'जवळ असलेल्या ज्ञानाचा आणि धैर्याचा पुरेपूर वापर करून मी कोवळ्या कळीवर उपचार करीनच', या निर्धाराने सातवांनी उपचारास सुरुवात केली. सुदैवाने मुलगी वाचली आणि मग लहान मुलांचे तज्ज्ञ डॉक्टर अशी सातवांची नवी प्रतिमा मेळघाटात निर्माण झाली. यानंतर दोन वर्षांनी डॉ. सौ. कविता सातव (MBBS Opthmology) यांनी धारणी येथे डोळ्यांचा दवाखाना सुरू केला. सुरुवातीची वर्षे-दोन वर्षे फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अशावेळी डॉ.आशीष यांनी पत्नीला धीर दिला. अत्यंत साधेपणाने जगून त्यांनी काही रक्कम जमवून २ लक्ष रुपयांचा Operating Microscope आणला. प्रभाकरराव पारसकरांनीही मदत केली. पुढे 'कस्तुरबा हेल्थ सोसायटी'चे धीरुभाई मेहता यांनीही साहाय्य केले. Sight Saver's, International Earing Friends, Mumbai या संस्थांचेही आजवर अर्थसहाय्य मिळाले आहे.

डॉ. कविताचा आत्मविश्वास व कामाचा झपाटा वाढला. त्यांनी मेळघाटांतल्या ५० खेड्यांत दारोदारी जावून रुग्णसेवा केली. अथांग त्यावेळी चारच महिन्यांचा होता. त्यामुळे बाळाला सोबत नेणे अपरिहार्य असायचे. जंगलातल्या झाडाला साडीची झोळी बांधून त्यात बाळाला झोपवायच्या व रोग्यांना तपासायच्या. वाटते तेवढे हे काम सोपे नाहीं त्यासाठी समर्पणाची गरज असते. समर्पित सेवावृत्तीमुळेच डॉ.कविताना भरपूर यश मिळाले आहे. रात्री अपरात्री घरी पोहोचल्यानंतर दवाखान्यात भरती झालेल्या रुग्णांसाठी भोजन शिजवून त्या त्यांना जेवू घालत. 'रुग्णसेवा हिच इश्वरसेवा' हाच भाव त्यांनी अंगिकारला होता. त्यामुळेच धारणी परिसरातील डॉक्टरांना त्यांचा अभिमान वाटायचा. मनमिळावू स्वभाव व प्रेमळपणासोबतच या दाम्पत्यांच्या सेवाभावामुळेच त्यांचा मित्रपरिवार खूपच वाढला आहे. त्यांनीही मदतीचा हात पुढे केला, सहकार्य केले. 'सेवा शब्दाविणही बोलकी, ती सर्व लोकांची मने जिंकी', हेच खरे सेवेचे प्राबल्य असते.

प्रारंभीच्या काळात डॉ. सातव बैलबंडीने नाही तर दुचाकीने खेड्यापाड्यांवर जात असत. मेळघाटाचा परिसर व्याघ्र प्रकल्प म्हणून

प्रसिध्द आहे. त्यामुळे घरी येईस्तोवर डॉ.कवितांचा जीव टांगणीस लागायचा. हे पाहून त्यांचे मोठे बंधू अविनाश यांनी एक जीप दिली. त्यामुळे त्यांच्या कार्याला गती मिळाली. पुढे डॉक्टरांनी धारणीच्या अलीकडे ९ कि. मी. अंतरावर असलेल्या उतावली या खेड्यात सडकेला लागूनच १ हेक्टर शेतजमीन विकत घेतली. ती महान संस्थेला २५ वर्षांच्या भाडे पट्ट्यावर वापरायला दिली. तेथे त्यांनी 'कर्मग्राम' वसविले आहे. महात्मा गांधीचे सेवाग्राम, डॉ. अभय बंग यांचे शोधग्राम तसेच हे डॉक्टर सातवांचे कर्मग्राम आहे. हळूहळू बांधकाम होवून कर्मग्रामाचा विकास होत आहे. सुरुवातीस झोपडीत दवाखाना सुरू केल्यानंतर चार महिन्यांनी सन्माननीय सुशीला नायर यांनी मदतीचा हात पुढे केला. तेव्हापासून सेवाग्राम येथील कस्तुरबा हेल्थ सोसायटी आणि महान ह्या दोन संस्था हातात हात घालून आरोग्यसेवेचे कार्य करू लागले आहेत. 'महान'ची आता सुंदर इमारत झाली आहे. कोब्रा, व्हायपर यासारखे विषारी साप येथे वारंवार पाहावयास मिळतात. परंतु सर्पमित्र असलेले डॉ. सातव या सापांना मारत नाहीत. सिपना नदीवर पाणी प्यायला येणारे पँथर, हरिणी, काळवीट, वाघ, बिबटे कितीतरी वेळा सातवांच्या झोपडीस भेट देवून जवळून निघून गेले आहेत.

असे हे खडतर जीणे. 'आपण दोघे उच्चशिक्षित डॉक्टर असूनही स्वत:च्या बाळाचेही चांगले संगोपन करु शकत नाही', याबद्दल दोघांनाही वाईट वाटायचे. पण हे जनसेवेचे व्रत त्यांनी जाणूनबुजून, समजून-उमजून घेतलेले आहे. 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने लब्ध प्रकाश, इतिहास, निसर्गमाने' या सावरकरांच्या व्रतसाधनेसारखेच हेही व्रत आहे. मग त्यांचे दुसरे मन त्यांना सांगायची, 'अरे, तुझा जन्म वैयक्तिक उपभोगासाठी नाहीच मुळी... राष्ट्राची सेवा करण्यासाठीच ईश्वराने तुमची नियुक्ती केली आहे', या विचाराने सगळी मरगळ निघून जायची. नवा उत्साह संचारायचा आणि पुन्हा नव्या दमाने कामाला सुरुवात व्हायची.

डॉ.आशीष स्वत:पेक्षाही पत्नीचेच कौतुक अधिक सांगतात. सासुबाई कमलताईंना कवितांचा खूप अभिमान वाटतो. माझी सुनच माझी लेक आहे, असे त्या ममतेने म्हणतात. प्रत्येक कसोटीच्या क्षणी धैर्यमेरु होवून कविता यांनी डॉक्टरांच्या कार्यात साथ केली आहे. एकदाचा प्रसंग फारच बिकट होता. डॉ. कविता मेळघाटातल्या एका पाड्यावर गेल्या होत्या. रोगी तपासतांना निघायला उशीर झाला. शेवटची बससुध्दा निघून गेली होती. परतीचे कोणतेच साधन उरले नव्हते. काय करावे, तिकडे घरी काय

परिस्थिती असेल? पण विचार करुनही काही उपयोग नव्हता, शेवटी त्यांनी रात्रभर त्या वाडीतच मुक्काम करण्याचे ठरविले. एका झोपडीच्या पडवीतच त्यांना झोपावे लागले. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी एका वाघाने गावावर हल्ला केल्याची घटना ताजी होती. पण करणार तरी काय? दुसरा पर्यायच उरला नव्हता. सकाळी पाचच्या सुमारास कुण्यातरी प्राण्याने डॉ. कविताच्या पोटावर पाय ठेवल्याचे त्यांना जाणवले. त्या पार घाबरुन गेल्या. वाघ असावा या भितीने त्या मोठ्याने ओरडल्या. डोळे उघडून पाहतात, एक गोंडस वासरू उडी मारुन गेले होते. सकाळी बाहेर गेल्यावर पानांची सळसळ कानावर पडली. काय बरे असेल! पाहतात तर जवळूनच एक भयंकर कोब्रा नाग सळसळ करीत जात होता. सुदैवाने प्राण वाचले. असे जीवघेणे प्रसंग येऊनही या दाम्पत्याचा निर्धार मात्र ढासळला नाही, हे मोठे वैशिष्ट आहे. त्यांना जाणीव होती की, 'थोर श्रध्दांना महान अग्निदिव्यातून जावे लागते'.

एक प्रसंग मातृत्वाचे दिव्यदर्शन घडविणारा आहे. वासराला पाहिलं की गाईला आपोआपच पान्हा फुटतो. तसंच स्त्री जीवनातही घडत असतं. अत्यंत दुर्मिळ, एकमेव आणि माणुसकीचा धर्म शिकविणारा हा प्रसंग डॉ.कविता यांच्या विशाल मातृहृदयाची साक्ष देणारा असाच आहे. एका आदिवासी बाईने बाळास जन्म दिला. ती महिला अतिशयच अशक्त होती. बाळंतपणही कठीण गेले. पण डॉ. कविताच्या कौशल्याने बाळ, बाळंतीण सुखरुप होते. नवजात बाळ कुपोषित होते आणि त्या मातेला अंगावरचे दूध सुध्दा येत नव्हते. त्या बाळाला कसे जगवावे, हा मोठा प्रश्न होता. त्यावेळी त्यांचा मुलगा अथांग ६ महिन्यांचा होता. त्यालाही आईच्या दुधाची गरज होतीच. पण डॉ. कवितामध्ये कवी यशवंतांची वात्सल्यसिंधू आई वास करीत होती. तिचे ठायी धरेचे सौंदर्य होते. मनाचा निर्धार करुन त्या कुपोषित बाळाला आपले दूध द्यायचे डॉ. कविता सातव यांनी ठरविले. 'अथांग'च अर्धावाटा त्या दूधभावास मिळू लागला. Heart takes Precedence over head. हळूहळू ते बाळ अंग धरू ही लागले. जणू काही कविता त्या बाळासाठी कृष्णाची यशोदा झाली होती. मानवतेचे एवढे विशाल दर्शन कुठेतरी घडू शकेल का?

संपूर्ण वेळ रुग्णसेवेसाठी जीवन समर्पित करणाऱ्या या ध्येयवेड्या दाम्पत्याला खाजगी जीवनासाठी वेळच मिळत नाही. कितीतरी संवेदनशील व आपत्तीच्या प्रसंगीसुध्दा प्रपंच की कर्मयोग असे द्वंद निर्माण झाले. त्या प्रत्येक वेळी त्यांनी कर्मालाच प्राधान्य दिले आहे.

अकोल्यास सासरे वारले असतांनाही डॉ.आशीष रुग्णावर उपचार केल्यानंतरच जाऊ शकले. त्यांच्या मातोश्री सौ.कमलताईंसुध्दा जेव्हा सेवाग्राम येथे अतिदक्षता विभागात भरती करण्यात आले होते, तेव्हा कर्मग्रामातील दवाखान्यात एक हृदयरोगी असल्याने ते भेटीस जाऊ शकले नव्हते. काही वर्षांपूर्वी कस्तुरबा हेल्थ सोसायटीचे अध्यक्ष धीरुभाई मेहता यांनी डॉ. आशीष यांना विद्यापिठाच्या असिस्टंट प्रोफेसरच्या पदासाठी मुलाखतीस जाण्याबद्दल सुचविले. परंतु दवाखान्यातल्या रुग्णांना सोडून ते गेले नाहीत. जेमतेम तिशीतल्या (त्यावेळी) तरुण डॉक्टरचा हा आदर्श नव्या पिढीसाठी प्रेरणादायीच आहे. कर्मास प्राधान्य देण्याचा पिंड असल्याने स्वतःचा मुलगा 'अथांग' बाळ दम्याने खूपच आजारी असतांनासुध्दा सौ.कविता सातव धैर्य व समजंसपणा याचं उत्तम उदाहरण पुढे ठेवत महाराष्ट्रातील कुपोषितांच्या प्रश्नांवरील महत्त्वाच्या शासकीय सभेसाठी मुंबईला गेल्या होत्या.

पुढील घटना तर खूपच विचित्र आणि सातवांच्या नैतिक बलसामर्थ्याची आहे. जानेवारी २०१२ चा हा प्रसंग. १४ व १५ जानेवारीला त्यांनी नेत्र शल्यक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. अशातच अचानक वकिलांचा फोन आला की, एका खुनाच्या प्रकरणात त्यांना अडकविण्याचे षडयंत्र रचले जात असून एक दोन दिवसात अटक होण्याची शक्यता आहे. बातमी अनपेक्षित अन् धक्कादायक होती. काय करावे? मेळघाट व मध्यप्रदेशातून येणाऱ्या ३० रुग्णांचे ऑपरेशन करायचे होते. डॉ. कविता यांची सारखी धडपड सुरू होती. त्यांना वकिलाच्या फोनबद्दल सांगणेही योग्य नव्हते. तरीपण सांगणे जरुरीचे होते. कॅम्प एकतर पुढे ढकलावा किंवा रुग्णांना नागपूर, सेवाग्राम येथे पाठवावे काय? असा ही विचार सुरू झाला. परंतु दूर आडवळणी खेड्यातून येणारे ते आदिवासी अत्यंत गरीब होते. हा खर्च करण्याची त्यांची ऐपत नव्हती. त्यांना असे वाऱ्यावर सोडणे माणुसकीला धरून नव्हते. अशावेळी डॉ. कविताने आपल्या नवऱ्याला, डॉ. आशीष यांना धीर देत एकटीनेच हे शिबीर पूर्ण करण्याचा विश्वास दिला. डॉ. आशीष यांना अटक झाली तरीही शिबीर झाल्याशिवाय राहणार नाही, असे ठरले. पत्नीचा दृढविश्वास आणि आदिवासी गोरगरिबांच्या विषयीचा जिव्हाळा पाहून डॉ. सातवांना पत्नीच्या या धाडसाचे खूप कौतुक वाटले. एवढी निर्भय वृत्तीची आणि समर्पित भावनेने काम करणारी पत्नी आपल्याला लाभली याचा त्यांना अभिमान वाटला. कोणतीही कुरकुर न करता अनेक

कठोर प्रसंगी कविता यांनी आजवर कितीदा तरी धैर्य दाखविले आहे. पण चांगल्या कामासाठी परमेश्वर सदैव पाठीशी उभा राहतोच. 'भिऊ नकोस। मी तुझ्या पाठीशी आहे', ही ईश्वरी अनुभती सातवांना आली. शेवटी अनीतिवर नीतिचा विजय झाला. डॉक्टरांवरचे आरोप खोडसाळपणाचे, बिनबुडाचे व सुडबुद्धीने केले असल्याचे निष्पन्न झाले आणि त्यांची अटक टळली. नेत्र शस्त्रक्रिया शिबीर ठरल्यावेळी संपन्न झाले.

२००४-०५ साली मेळघाटातल्या कुपोषणाचा प्रश्न टी.व्ही., वृत्तपत्रे व अन्य प्रसारमाध्यमातून खूपच गाजला. या प्रश्नाने राज्यकर्त्यांची झोप उडविली. आरोग्य विभागाचा निष्काळजीपणा आणि शासकीय अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा चव्हाट्यावर आला. डॉ. सातवांनी केलेल्या सर्वेक्षणातून मिळालेली माहिती आणि आरोग्यविभागाने शासनाकडे पुरविलेली आकडेवारी यात कमालीची तफावत होती. 'महान'च्या सर्वेक्षणानुसार मेळघाटात ९० टक्के कुपोषित निघाले, तर शासन मात्र हे प्रमाण फक्त १.५ टक्के दाखवित होते. आरोग्य विभागाची सातवांबद्दल नाराजी ओढवणे साहजिकच होते, त्यामुळे डॉक्टरांना अनेक शत्रू निर्माण झालेत. त्याच्याविरुध्द खोटी प्रकरणे उठविण्यात आली. 'महान'ला अडचणीत आणण्याचे पुष्कळ प्रयत्न झालेत. डॉक्टरांना जीवे मारण्याच्या धमक्या सुध्दा येवू लागल्या. कोर्टकचेऱ्या व पोलीस प्रकरणात अडकविण्याचेही प्रयत्न झाले. डॉक्टरांनी मोठ्या कष्टाने खेडोपाडी जाऊन आरोग्यदुतांची फळी निर्माण केली होती. त्यांच्यावर काम बंद करण्यासाठी दबाब आणण्यात आला. परंतु कुणीच त्या दडपशाहीला शरण गेले नाही. त्यांना जाणीव होती की, 'जो खूप सहन करील, त्याला पुष्कळ काही करुन दाखविता येईल'. डॉ. सातावांना ही सहनशक्ती, हे बळ बाबा आमटे यांच्या विचारातूनच मिळाले आहे. म्हणूनच अशा कठोर प्रसंगीसुध्दा ते डगमगले नाहीत की नमलेसुध्दा नाहीत. सातवांच्या कुपोषणाबाबतच्या निष्कर्षाची चौकशी करुन सत्य जाणून घेण्याचे शासनाने ठरविले. राजमाता जिजाऊ मदर अँड चिल्ड्रेन हेल्थ अँड न्युट्रीशन मिशनचे डायरेक्टर डॉ. गीते आणि युनिसेफचे (महाराष्ट्रप्रमुख) राजू नायर यांनी सातवांच्या प्रकल्पांना जातीने भेटी दिल्या. बालमृत्यू व कुपोषण याबाबत डॉ.सातव यांनी केलेल्या सर्वेक्षणातील निष्कर्षाबाबत खातरजमा करुन घेतली. त्यांचे संशोधन व निष्कर्ष खरे व योग्य असल्याचा निर्वाळा दिला. तेव्हा शासन खडबडून जागे झाले. मेळघाटाच्या या घटनेने संपूर्ण राज्यातला कुपोषणाचा प्रश्न ऐरणीवर

आला. शासनाने लक्ष घातल्यामुळे मग लक्षावधी कुपोषणग्रस्तांना त्यांचा लाभ झाला.

२००६-०७ पासून डॉ. सातवांना शासनाचे चांगले सहकार्य मिळू लागले. त्यामुळे संबंधितांचा पोटशूळ वाढला. डॉक्टरांच्या कामात अडथळे आणण्याचे, मनस्ताप देण्याचे प्रकार वाढले. अशावेळी अमरावती येथील 'प्रयास' चे डॉ. अविनाश सावजी यांनी 'मधुकर' या ग्रंथाचा संदर्भ देऊन 'जशास तसे' बाबत सुंदर मार्गदर्शन केले. 'तलवारीशी तलवारीने नव्हे; तर ढालीने लढले पाहिजे. क्रोधाला प्रेमाने जिंकले पाहिजे', या आचार्य विनोबा भावेंच्या विचारांची आठवण करून दिली. डॉ.सावजी यांच्या सल्ल्यानुसार सातवांनी आपले धोरण ठेवले. आरोग्य विभागाशी निष्कारण संघर्ष करुन मनस्ताप वाढवून घेण्यापेक्षा आणि वेळ घालविण्यापेक्षा त्यांनी जनजागृती करण्याचा मार्ग निवडला. त्यांच्या कार्यास नवी दिशा मिळाली. लोकसंपर्क वाढून त्यांच्याविषयी जनतेत विश्वास निर्माण झाला. त्यामुळे हळूहळू जनतेचा सातवांना पाठिंबा मिळत असल्याचे पाहून विरोधक थंडावले. याप्रसंगी सातवांना म.गांधी, सावित्रीबाई फुले, येशू ख्रिस्त यांनी सोसलेल्या यातनांचे स्मरण झाले व त्यानेच त्यांना धीर मिळाला.

अशा प्रकारे डॉक्टर सातवांचे कार्य आगीत तावून सुलाखून निघालेल्या सोन्यासारखे उजळले आहे. असे अनंत अडथळे आले तरीही या दाम्पत्याने मेळघाट सोडण्याचा विचारदेखील केला नाही. 'साहसे श्रीः वसति' हे त्यांनी दाखवून दिले.

**नव्या क्षितीजाकडे वाटचाल**

१९९८ साली डॉक्टरांनी मेळघाट मध्ये दवाखाना सुरू केला, तो फक्त रोग्यांवर उपचार करण्याच्या एकमेव विचारानेच. आणखी काही करण्याचा त्यावेळी विचारसुध्दा केला नव्हता. परंतु दीड-दोन वर्षांच्या वास्तव्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, आदिवासींना आरोग्यशिक्षण दिल्याशिवाय मेळघाटातली स्वास्थ समस्या सुटणारच नाही. त्यासाठी त्यांनी गावागावाशी संपर्क साधून स्लाईड शो, गटसूची याद्वारे वातावरणनिर्मिती केली. सत्त्वयुक्त व कॅलरीयुक्त आहाराचे महत्त्व तसेच ताजा भाजीपाला, पोषक आहार यामुळे कुपोषण टाळता येते, याविषयी मार्गदर्शन केले. परंतु आठवडी बाजारातून आठवड्याचा भाजीपाला एकदाच विकत आणणाऱ्या खेडुतांना दररोज ताजा भाजीपाला मिळणार तरी कसा? पण त्यावर उपाय शोधायलाच हवा ना! परसबाग हा त्यावरचा चांगला उपाय होता. परंतु लोक

म्हणायचे, 'आम्हाला तर प्रातर्विधीसाठी, आंघोळीसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी नदीवरच जावे लागते, मग परसबाग करणार तरी कशी? त्यांचेही खरेच होते. मग डॉक्टरांनी नव्या दमाच्या तरुणांचे सहकार्य घ्यायचे ठरविले. त्यांच्यात वैचारिक जागृती केली. आरोग्याचे प्रश्न, निसर्ग शेती, परसबाग, लोकसेवेसाठी वेळ देण्याची व त्याग करण्याची वृत्ती, शासनाच्या लाभकरी योजनांची माहिती याबद्दल खेडोपाडी जावून, सहविचार सभा घेवून तरुणांमध्ये उत्साह निर्माण केला. मेळघाटातील १७ खेड्यांत कृषीतज्ज्ञ मनोहरराव खाके यांच्या मार्गदर्शनाखाली जवळपास २००० परसबागा तयार करण्यात आल्या. प्रयोग यशस्वी झाला. पर्यावरणाची शुध्दता टिकवून आरोग्यदायी पोषक अन्न तयार करण्याच्या कामाला यश आले. नव्या क्षितिजावर नवी पहाट उगवली.

२००१ साली जेव्हा डॉ. कविता यांनी मेळघाटात नेत्र रुग्णालयाची सुरुवात केली, त्यावेळी प्रत्येक अवयवासाठी विशेष तज्ज्ञ डॉक्टर असतात यांची ग्रामस्थांना कल्पनासुध्दा नव्हती. डोळ्याचे डॉक्टर, हाडाचे डॉक्टर, कान-नाक-घशाचेही डॉक्टर असतात, याची त्यांना कल्पनाच नव्हती. नेत्रशस्त्रक्रिया हा प्रकारही त्यांना ठाऊक नव्हता. त्यामुळे असे रोगी दवाखान्यात यायलासुध्दा तयार होत नसत. यावर उपाय म्हणून त्यांनी 'अंधत्व निवारण' कार्यक्रम दारोदारी हिंडून राबविला. आरोग्य शिक्षण कार्यक्रम, रोगनिदान व उपचार, शिबीरे, शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी, असे उपक्रम मेळघाटातल्या १३० गावात राबविले. त्याला चांगला प्रतिसाद मिळून प्रचंड लोकप्रियता व लौकिक प्राप्त झाला.

खरे म्हणजे मेळघाट कुपोषण व बालमृत्युसाठीच प्रसिध्द आहे. स्वत: बालरोगतज्ज्ञ नसल्याकारणाने या विषयाला स्पर्श न करण्याचे डॉक्टरांनी ठरविले होते. परंतु एक प्रसंग असा घडला की, एकदा त्यांच्या बाह्यरुग्ण विभागात एक विधवा आदिवासी बाई तिच्या दोन वर्षाच्या कुपोषित बालकास घेऊन आली. त्याला धड श्वासही घेता येत नव्हता. खूपच अत्यवस्थ होता तो. त्याच्या छातीवर तांदूळ व गेरु माखलेला होता. कोंबडीचे पंख चिकटलेले होते. कातडीला लोखंडी गरम सळईने चटके दिलेले होते. गळ्यात लसणांच्या पाकळीची माळ घातली होती. सातवांनी तिला बाळाला दवाखान्यात भरती करण्याविषयी सुचविले. पण ती बाई तयारच होत नव्हती. खूप वेळ समजावून पण उपयोग झाला नाही. शेवटी तर बाळाला भरती केले नाही, तर ते नक्कीच दगावेल, असेही सांगितले. त्यावर

ती म्हणाली, 'मरु दे मेले तर, मले आणखी चार लेकरं आहेत. याचं इथं करत बसली, तर तिकडं बकऱ्या-कोबंड्यांकडे कोण लक्ष देईन'. ती निघून गेली. तिसरे दिवशी वाईट बातमी कानावर आली. वैद्यकीय उपचाराअभावी तिचे बाळ खरोखरोच दगावले होते. सर्वांना खूप वाईट वाटले. दारिद्र्य आणि अज्ञान काय असते त्याचे भीषण दर्शन झाले. त्यानंतर लागोपाठच बालमृत्युच्या बातम्या वारंवार कानावर येऊ लागल्या. त्यावेळी मात्र डॉ. आशीष आणि कविता खूपच अस्वस्थ झाले. यात लक्ष घातले पाहिजे. 'कोवळ्या कळ्या' वाचवल्या पाहिजे. कळ्याच कोमेजल्या तर फुलांचे ताटवे तरी कसे बहरतील. बरेच चिंतन केल्यावर आता खेड्यापाड्यात शिबिरे घ्यायची, असे त्यांनी ठरविले. पण हे काम सोपे नव्हते. मेळघाटात १३७ खेडी आहेत. तीसुध्दा आडवळणी, डोंगरात, माळरानात, खडकाळ, गोटाळ भागात. तेथे जायला रस्ते नाहीत, कुठली सुविधा नाही अशी सारी विपरित परिस्थिती होती. इतक्या गावाशी संपर्क करणे सुध्दा अशक्यप्रायच होते सतत १० वर्षे शिबिरांचा प्रयोग करुनही फारसे यश हाती लागतच नव्हते. कारण रुग्णाला ताबडतोब औषधोपचार करु शकणारी यंत्रणाच उपलब्ध नव्हती. काय करायचे? कसे करायचे? परंतु इच्छा तेथे मार्ग सापडतोच. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉ.अभय बंग यांनी गडचिरोली भागात नवजात शिशुच्या देखभालीसाठी घरगुती शुश्रूषा केंद्राचा प्रयोग यशस्वी केल्याचे सातवांना समजले. त्यांना भेटून, चर्चा करुन डॉ. आशीष यांनी मेळघाटात असा प्रयोग करण्याचे ठरविले आणि वेगवेगळ्या भागातील ३८ खेडी दत्तक घेतली. विचार अगदीच नवा होता. पूर्वानुभवसुध्दा गाठीशी नव्हता. अल्पशिक्षित किंवा निरक्षर ग्रामीण महिलांची गावकऱ्यांच्याच सल्ल्याने निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम काही सोपे नव्हते. सोबतच कुपोषणाचे सर्वेक्षण, बालमृत्युच्या कारणांचे निरीक्षणसुध्दा करावयाचे होते. यासाठी ३८ खेड्यातील बालकांच्या जन्ममृत्यूची नोंदणी, त्यांची वजने नियमित घेणे असे प्रयोग १९ खेड्यात घरोघरी भेटी देऊन करण्यात आले. उर्वरित १९ खेड्यात जेथे असे करणे शक्यच नव्हते, त्याठिकाणी केवळ विचारपूस करुन माहितीचे संकलन केले. याच सर्वेक्षणामधून मेळघाटातील कुपोषणाचे भीषण चित्र जगासमोर आणण्यास मदत झाली. कुपोषणावर उपाय करण्याचा मार्ग शोधता आला. १७ खेड्यात जवळपास ६० टक्के बालमृत्यु रोखण्यात डॉक्टरांना यश आले. त्यामुळे त्यांचा लौकिक वाढला. त्यांना 'युवाशास्त्रज्ञ' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. Indian Medical Council च्या राष्ट्रीय

परिषदेत भाषणाद्वारे या विषयाचे सादरीकरण करण्याची संधीही मिळाली आणि संशोधनाला नऊ आंतरराष्ट्रीय वैद्यकीय अधिवेशनातून मान्यताप्राप्त झाली. 'ज्ञान गाळते घाम' ही डॉ. आशीष सातवांची कार्यशैली सिध्द झाली. यातूनच हजारो पंखांना उड्डाणाची प्रेरणा मिळाली. आरोग्यदुतांच्या रुपाने डॉक्टरांनी अशा पंखाची निर्मिती केली. यात प्रेरणा, विद्या, काकुली, विठ्ठल पांडे, अजय यांच्यासारखे समर्पित भावनेने काम करणारे प्रशिक्षकही आहेत. हेच पुढे हजारो पंखांना उड्डानाची प्रेरणा देतील, असा सातवांना विश्वास आहे. महानच्या कार्यात अलिकडे प्रसिध्द समाजसेविका डॉ. वर्षा तारककाटे यांचेही चांगले सहकार्य मिळत आहे. सुकरी बाई जांबेकर, कांताबाई वामखेडे, सुमनतारा धांदे, शमीम बशीर, शीला, उर्मिला यांच्यासारख्या जेमतेम ५ वी, ६ वी शिकलेल्या किंवा अशिक्षित अशा 'आरोग्यदूत' खेडुतांसाठी तर 'देवदूत' ठरल्या आहेत.

मान्सुधावडी या खेड्यातील आरोग्यदूत सुकरीबाई काशीराम जाम्बेकर ही महिला ७ वी शिकलेली आहे. तिच्या नवऱ्याचे खेड्यातच छोटेखानी किराणाचे दुकान आहे. डॉ.सातवांनी ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांच्याच सल्ल्याने त्यांच्या विश्वासतल्या अशा ह्या हेल्थ वर्कर्स निवडल्या. त्यांना प्रशिक्षण दिले. गर्भवती स्त्रिया ओळखणे, प्रसुतीपूर्व घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन करणे, वेळापत्रकानुसार दिवसावर औषधी, गोळ्या देणे, इतरही आजारांवर औषधोपचार करणे, याबाबत अशा अडाणी बायांना प्रशिक्षण देणे अतिशय कठीण गेले. तरीही डॉक्टरांनी प्रयत्न सोडले नाहीत. गडचिरोली जिल्ह्यातील 'सर्च' येथे पाठवून त्यांना पुरेपूर तयार केले.

सुकरीबाई दिसायला नाकीडोळी नीटस, राहणी साधी, डोईवर शालीन पदर, बोलण्यात माधुर्य, बुद्धी तल्लख. तिचे घर कुडाचेच पण मांडणी व्यवस्थित असलेले. रात्री अपरात्री कंटाळा न करता मदतीला धावून जाणारी सुकरीबाई मान्सुधावडीतल्या सर्वांची आवडती आहे. न्युमोनिया, मलेरिया, डायरियावरील औषधे, त्यांचे प्रमाण तिला सारे तोंडपाठ आहेत. सुरक्षित प्रसुती करणारी म्हणून तीची प्रसिध्दी आहे. एकदा सुकरीबाई गावातील एका महिलेच्या बाळंतपणासाठी गेली. बाळाची नाळ गळ्याभोवती गुरफटलेली होती आणि बाळ पायाकडून बाहेर आलेले. प्रसंग अतिशय बिकट होता. मदतीसाठीसुध्दा दुसरे कोणी नव्हते. मुख्य सडकेपासून गाव ३० किमी अंतरावर. साधन कोणतेच नव्हते. परंतु अशा कठीणप्रसंगी

सुकरीबाई डगमगली नाही. सतत ६ ते ८ तासांपर्यंत प्रयत्न करून तीने प्रसुती यशस्वीपणे पार पडली. बाळ-बाळंतीण दोघेही सुखरूप वाचले. त्या झोपडीत आतापर्यंत तणावाचे वातावरण होते, तेथे आता आनंद भरला. सुकरीबाईचे स्वत:चे बाळ फक्त दीड महिन्याचे होते. आईपासून जवळपास १० तास दूर असणाऱ्या बाळाला आईचे दूधसुध्दा मिळालेले नव्हते. रात्री १२ च्या सुमारास सुकरीबाई घरी परतली. घरात सगळीकडे सन्नाटा होता. कुणी काहीच बोलत नव्हते. नवरा उदास होऊन बसला होता. मुलगी निपचित पडून होती. तिची हालचाल मंदावली होती. डबडबल्या डोळ्यांनीच सुकरीबाईने मुलीला मांडीवर घेतले. तिने शेवटचा आचका दिला अन् जगाचा निरोप घेतला. सुकरीबाईचे मातृहृदय हळहळले. खूप खूप रडली. तिचा नवरा खूप मोठ्या मनाचा होता. तो म्हणाला, ‘रडू नकोस आपल्या घरातला एकच जीव गेला, पण तू दोन जीव वाचवले आहेस’. आदिवासी तरुणाचे हे बोल खरोखरच किती भावस्पर्शी आणि मानवतेचे दर्शन घडविणारे आहे. सुकरीबाईच्या त्यागामुळेच तिला सेवेचे फळ मिळाले. शासन दरबारी तिचा सन्मान झाला. ‘जीवनाच्या मांगल्याची जाणीव हाच जगातला सर्वश्रेष्ठ धर्म आहे’. सुकरीबाईने ते सिध्द केले.

मीराबाई नावाची आरोग्यदूत सुध्दा जेमतेम ७ वी पर्यंतच शिकलेली आहे. तिच्या केंद्रगावी २ वर्षांची ‘लक्ष्मी’ मृत्युशी झुंज देत होती. लक्ष्मीला न्युमोनिया झाला होता. २ वर्षाच्या मुलीचे वजन खरेतर १० कि.ग्रॅ. असायला हवे, पण लक्ष्मीचे वजन फक्त ५ कि. ३०० ग्रॅम एवढेच होते. मीराने डॉक्टरांना तिच्याकडे नेले. पाहतात तर घरची मंडळी देवापूढे उदबत्ती लावून प्रार्थना करीत बसली होती. डॉ. आशीष यांनी वैद्यकीय उपचार करण्याबद्दल सांगितले, तर ते लोक ऐकतच नव्हते. बराचवेळ मिन्नतवारी केल्यानंतर तयार झाले. मीराबाईने डॉक्टरांच्या मार्गदर्शनात सतत ७० दिवसपर्यंत लक्ष्मीवर उपचार केले. तिच्यात सुधारणा झाली. तिचे वजन ७ कि. ८०० ग्रॅमपर्यंत वाढले. तिचा न्युमोनिया बरा झाला. आता हेच गावकरी मीराबाईचे आणि डॉ सातवांचे स्तुतीपाठक बनले आहेत.

ही कथा तारणवाडीतील ‘रेशमा’ नावाच्या अनाथ बालिकेची आहे. आरोग्यदुताच्या सल्ल्यावरून एकदा तिची म्हातारी आजी तिला दवाखान्यात घेऊन आली. २ वर्षाच्या रेशमाचे वजन फक्त ५ किलो होते. कुपोषित आणि रक्तक्षीणता यामुळे मुलीचे ओठ फाटले होते. तिला धड रडतासुध्दा येत नव्हते. तिच्यावर डॉ. दिलीप गहाणकरी यांनी यशस्वीरित्या प्लॅस्टिक सर्जरी

केली. आता तिचे ओठ जुळले आहे. रडणाऱ्या रेशमाचा ओठावर आता हसू उमटले आहे.

आता मेळघाटातल्या आदिवासींनी 'महान'ला पूर्णपणे स्वीकारले आहे. परंतु सुरुवातीला हा एम.डी. डॉक्टर मेळघाटात खरोखरच राहील का? किंवा काही महिन्यातच पळून तर जाणार नाही ना? अशी लोकांना शंका यायची. सातवांनासुध्दा कोकरू आदिवासी आपल्याला स्वीकारतील की नाही, अशी शंका यायची. काहींना तर असेही वाटायचे की, हा झोपडीत राहणारा, सायकलवरून फिरणारा माणूस खरोखर डॉक्टर असेल का? डॉक्टर बंगल्यात राहतात, मोटारीतून फिरतात, असाच कोरकुंचा समज होता. परंतु आता इतक्या वर्षानंतर चित्र पार बदलले आहे.

डॉ .कविताच्या बाबतीतही हेच घडले होते. परंतु पुढे पुढे प्रतिसाद मिळू लागला. दवाखान्यात रोग्यांची संख्या वाढू लागली. मेळघाटातच नेहमीसाठी कार्य करण्याच्या निर्धाराला बळकटी आली. गेल्या १० वर्षात बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यात शासनाला यश आले नव्हते. परंतु 'महान'च्या प्रयोगामुळे ५ वर्षाखालील बालकांच्या मृत्युचे प्रमाण ५६ टक्के पेक्षाही अधिक कमी करण्यात डॉ. सातवांना यश आले. १७ गावातील आरोग्यदुतांचा यात मोठा वाटा आहे. मागील आठ वर्षात ७५ हजार रुग्णांवर आरोग्यदुताच्या मदतीने उपचार करणे शक्य झाले आहे. २००४ साली हिवाळ्याच्या दिवसात ३८ गावातील कुपोषित मुलांना सतत १०० दिवसापर्यंत पोषण आहार पुरविण्याचे मोठे काम 'महान'ने केले. कुपोषणाबाबत माहिती देणारा व पोषण आहाराविषयी मार्गदर्शन करणारा तक्ता 'महान'ने तयार केला, तो आता अमरावतीसह मेळघाटातील सर्व सरकारी दवाखान्यात लावण्यात आला आहे. चुकीची जीवनशैली, आरोग्यविषयक अज्ञान, व्यसनाधिनता, तज्ज्ञ डॉक्टरांची उणीव अशा कारणांनी मेळघाटात १६ ते ६० वयोगटातील मृत्युचे प्रमाण वाढले. टी.बी हार्ट अटॅक, ब्लडप्रेशर, न्युमोनिया, डायरिया, मलेरिया, जीर्णज्वर यामुळे कधी कधी तर आजाराला कंटाळून लोक आत्महत्यासुध्दा करतात, हे डॉक्टर सातवांना अनुभवातून लक्षात आले. ह्या गोष्टी टाळण्यासाठी प्रशिक्षित आरोग्यदुतांचा भरपूर उपयोग त्यांना झाला. सातत्यपूर्व प्रयत्न, समुपदेशन यामुळे १६, १७ गावातील मृत्युदर ३५ टक्के कमी करण्यात ते यशस्वी झाले आहेत. विशेष रोगनिदान शिबिरातून १७०३४ रुग्णांवर उपचार करण्यात आले. कस्तुरबा हेल्थ सोसायटी, बृहद भारत समाज यांच्या

सहकार्याने ८६३ नेत्र शल्यक्रिया २७० जळीत व्यक्तींवर प्लॅस्टिक सर्जरी, ३६ दंतशस्त्रक्रिया याशिवाय अन्य रोगावरील शस्त्रक्रिया करण्यात 'महान'ने यश मिळविले आहे. जवळपास ८२५४३ लोकांसाठी ४००० आरोग्य शिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. चित्रफितीद्वारे पाड्यावरील अशिक्षित कोरकुंना प्रबोधन करण्यात आले.

महानच्या 'उमंग' उपक्रमाचा लाभ २०० पेक्षाही जास्त लोकांनी घेतला आहे. योगसाधना, स्पोर्टक्लब, मानस विकास मंच, बालसंस्कार, व्यसनमुक्ती उत्सव, बालसंस्कार मोती, सहचर्चा यासारख्या उपक्रमांमुळे लोकांची जीवनपध्दती, सवयी सुधारण्यास व व्यसनाधिनता कमी करण्यात खूपच उपयोग झाला आहे. होळीसारख्या सणालाही आता पुर्वीसारखी दारु ढोसतांना लोक दिसत नाहीत. हे 'उमंग' चे केवढे मोठे यश म्हणावे लागेल. अंगणवाड्यातील, शाळांमधील समुपदेशन कार्यक्रम यांचा भरपूर लाभ आता कोरकुंना होत आहे. शासकीय रुग्णालयातील रुग्णांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी रुग्णांना चांगली सेवा मिळावी, मदत मिळावी म्हणून 'महान' व 'खोज' या संस्थांच्या विनंतीवरून अनेक तरुणांना मेळघाटातील सरकारी दवाखान्यात समुपदेशकांचे काम मिळाले आहे. त्यामुळे डॉक्टर व जनता यांच्यात सुंदर समन्वय साधला जात आहे. कुपोषित बालके, गर्भवती स्त्रियांना दवाखान्यात भरती करण्याचे व नियमित औषधोपचार घेण्याचे महत्त्व आदिवासींना पटले आहे.

शासकीय रुग्णालयांना नियमित भेटी देऊन त्यांच्या प्रगतीसाठी योग्य अशा सूचना देण्याचा 'महान'चा देशातील हा पहिलाच कार्यक्रम असावा. त्यामुळे चौर्यकर्म व भष्ट्राचार करण्यास लालसावलेल्या भ्रष्टजनांना व असामाजिक तत्त्वांना ते रुचले नाही. त्यामुळे सातवांना पुन्हा त्रास सुरू झाला. एका भ्रष्ट अधिकाऱ्याने आदेश काढून हा उपक्रम बंद केला. पण मुंबई उच्च न्यायालयाने हा कार्यक्रम पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले. एवढेच नव्हे तर 'महान'सारखा उपक्रम सर्व राज्यात राबविण्याच्या सूचनाही आदेशात दिल्या. 'सत्यमेव जयते' ची प्रचिती आली. ज्याप्रमाणे एखादा चेंडू ताकदीने आपटला, तर तो तेवढ्याच वेगाने वर उसळतो, तसेच प्रचंड विरोधातूनच सातवांचे कार्य उजळून आले आहे.

कोकमारची ही घटना फारच बोलकी आहे. चांगल्या कामात विघ्न आणणारे लोक या जगात भरपूर आहेत. कोकमार हे मेळघाटातले अतिदुर्गम भागातले, विकासापासून फार लांब राहिलेले खेडेगाव आहे. तिथल्या

आरोग्यसेविकेवर दबाव आणून समाजकंटकांनी काम बंद करण्यास बाध्य केले. 'डॉ. सातव स्वत:चे नाव मोठे करण्यासाठी सगळे नाटक करत आहेत. आपल्या गावाला बदनाम करीत आहेत. कुपोषण वगैरे खोट्या गोष्टी आहेत. तुम्ही त्यांना बळी पडू नका', इ. सांगून लोकांच्या मनात भूत घालून दिले. डॉक्टरांना काय करावे, हे सूचत नव्हते. जर आरोग्यसेवा बंद पडली, तर गावावर परिणाम होणार, मृत्युचे प्रमाण वाढणार, रोगराई वाढणार होती. डॉक्टर खूपच अस्वस्थ झाले. काहीही होवो लोकांना भेटून आपणच समजावून सांगितले पाहिजे, असा विचार करुन आल्हाद काशीकर व इतर कर्मचारी घेऊन दुचाकीने ते कोकमारला पोहचले. पण गावकऱ्यांनी फारसा उत्साह दाखविला नाही. लोक जमले खरे, पण कुणीच काहीच बोलत नव्हते. एवढ्यात त्या ठिकाणाहून एक लहान मूल जात होते. त्याच्या हातात शिळ्या भाकरीचा तुकडा होता. अत्यंत हाडकुळा, पोट वाढलेले, हातापायाच्या काड्या झालेल्या, डोके शरीरापेक्षा खूपच मोठे, डोळे बटबडीत, चेहरा काळवंडलेला, चालताना त्याच्या पायाला आठ्या पडत होत्या. सातवांनी त्या मुलास पाहिले, त्यांनी त्याला उचलून जवळ घेतले. गेल्या ३ महिन्यांपासून त्याला पोषण आहारच मिळालेला नव्हता. अंगणवाडीतूनही काही मिळाले नव्हते. सातवांनी त्या मुलाची चौकशी केली. त्याचे नाव, गाव विचारले. वृत्तपत्रामधून त्याचे फोटो छापले. कुपोषिंताचे प्रश्न जगासमोर मांडले. परिणामी त्या मुलांची विशेष दखल शासनाने घेतली. त्याला शासकीय मदत मिळाली. मुलाची प्रकृती सुधारली. प्रत्यक्ष पुराव्याने खेडुतांच्या हे लक्षात आणून द्यावे लागले, तेव्हा कुठे त्यांच्या मनातले संशयाचे भूत निघून गेले. गैरसमजाचे मळभ दूर झाले.

एकदा बिहाली खेड्याजवळ फार मोठा अपघात झाला. ५० उतारुंना घेऊन जाणारा ट्रक नदीत कोसळला. १० जण जागीच ठार झाले. १२ पेक्षा जास्त जण मृत्युशी झुंज देत होते. परंतु संवेदनशीलता हरविलेल्या याकाळात कुणीच मदतीला धावून गेले नाही. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांनी थोडेही सौजन्य दाखविले नाही. सातवांना घटनेची माहिती कळताच ते घटनास्थळी धावून गेले. सातवांसह तिघांनी नदीत उतरून सर्व अपघातग्रस्तांना बाहेर काढले व दवाखान्यात पाठविले. त्यातला १ जण दगावला. परंतु ११ जणांचे प्राण वाचविण्यात यश आले.

अशा अनेक अपघातग्रस्तांना सातवांच्या कार्यकर्त्यांनी संकटातून बाहेर काढलेले आहे. सातवांचे समाजकार्य केवळ दवाखान्यापुरते मर्यादीत

नाही. मेळघाटातले कोरकु आदिवासी अनेक वर्षांपासून शेती करतात. शासनाकडूनच त्यांच्या पूर्वजांना ही शेती मिळाली आहे. परंतु निरक्षर आदिवासींकडे त्याची कागदपत्रे नाहीत, सातबारा नाहीत. त्यामुळे शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्यात अडचणी येत होत्या. डॉ. सातव यांनी या प्रकरणात लक्ष घातले. सर्व आदिवासी शेतकऱ्यांना संघटीत करुन शासनावर दबाव आणला आणि ७/१२ मिळविले .त्यामुळे आता शासनाच्या योजनांचा लाभ आदिवासींना मिळू लागला आहे.

'तपसा लभ्यते सर्वम्' असे म्हणतात, ते खरेच आहे. सातवांच्या 'श्रमांना आता घामाची फुले' आली आहेत. त्यांची कीर्तीपताका अव्याहत फडकत आहे. त्यातूनच अनेक महत्त्वपूर्ण पदांवर, समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली आहे. केंद्र व राज्य शासन त्यांना सल्ला विचारू लागले आहे. प्रचारमाध्यमांनी सुध्दा त्यांच्या कामाची दखल घेतली आहे. मुंबई दूरदर्शन, दिल्ली दूरदर्शन, ईटीव्ही(मराठी), साम टीव्ही, आयबीएन लोकमत, एनडीटीव्ही, अशा वाहिन्यांनी त्यांचे कार्य जगासमोर आणले आहे. Caring Friends कस्तुरबा हेल्थ सोसायटी, डॉ. सुशीला नायर, धीरुभाई मेहता, हळबे, Nico Nobel & Stiching Geron, The Netherluands, डॉ.अविनाश सावजी, डॉ.भारद्वाज, डॉ.गहुकार, श्री. व सौ. जयश्री पेंढारकर, विजय कावरे, पाळसकर, वरणगावकर, काशीकर सातव, रेंगें, मानेकर, कुटुंबीय, डॉ.गहाणकरी, डॉ.मुदुला बापट, डॉ.विभावरी दाणी, सोबतच आजोबा वसंतराव बोंबटकर, आई-वडील, भाऊ, पत्नी, मुलगा या सर्वांचे भरपूर योगदान सातवांच्या समाजसेवेला लाभले आहे.

शालेय मुलांना सायकलींचे, चष्म्यांचे, गणवेशाचे वाटप करणे, आर्थिक मदत करणे, सुसंस्कार देणे अशा उपक्रमातून मेळघाटात शिक्षणाची नवी पहाट उगवत आहे. 'उमंग'मुळे 'आमच्या गावात आम्हीच सरकार' ही संकल्पना रुजत आहे. ग्रामोन्नतीचा दिवा प्रकाशमान होत आहे. डॉ. आशीष व डॉ. कविता सातव हे झपाटलेले दांम्पत्य म्हणजे व्रतस्थांसाठी फार मोठा आदर्श आहे.

जेमतेम तिशीच्या वयात समाजसेवा सुरू करणाऱ्या तरुण डॉक्टरच्या कार्याचा, 'महान'च्या प्रगतीचा उर्ध्वगामी आलेख पाहिला म्हणजे 'जे दुसऱ्यासाठी जगतात, ते खऱ्या अर्थाने जिवंत असतात', हे पटते.

सभोवतालचा सारा संसार सुखी व्हावा, निरोगी व्हावा, ही त्यांची साधना आहे. डॉ. आशीष, डॉ. कविता, त्यांचे सहकारी, मित्रपरिवार

निष्ठावान आरोग्यदूत यांनी केलेले कार्य, त्यांची जिद्द, समर्पण, त्याग, साहस, भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी, सेवाधर्म हे सगळे पाहिले म्हणजे आपोआपच कर्मयोगी बाबा आमटे यांच्या ओळी आठवतात-

'येथे नांदतात श्रमर्षी, या भूमीला मरण नाही
येथे ज्ञान गाळते घाम, विज्ञान दानवशरण नाही
येथे कला जीवनमय, अर्थाला अपहरण नाही
येथे भविष्य जन्मत आहे, या सीमांना मरण नाही!'

संपर्क
**डॉ. आशीष सातव**
महात्मा गांधी आदिवासी रुग्णालय
कर्मग्राम, उतावली, ता. धारणी, जि. अमरावती
पिन-४४४ ७०२. (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०७२२६) २०२२९१, २०२७९३
भ्रमणध्वनी : ९३२५०९४७८०, ९४२३११८८७७
ईमेल : drsatav@rediffmail.com
वेब : www.mahantrust.in

◆◆◆